# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २७/११/२०१५**

**सकाळी ११.३० वा.**

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २०/११/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २०/११/२०१५ रोजीचे इतिवृत्त दुरुतीसह कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.अब्दुल हक सुलेमान पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ मधील फुटपाथ/ डिवायडरर्स दुरुस्ती व रंगकाम करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- प्रभाग समिती एफ कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी फुटपाथ व डिवायडर्स नादुरुस्त अवस्थेत आहेत. स्वच्छ अभियान अंतर्गत सदर फुटपाथ/ डिवायडर्स दुरुस्ती/ रंगरंगोटी करणे आवश्यक आहे. त्याकामी होणाऱ्या रक्कम रुपये २५ लाख खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री. अब्दुल हक सुलेमान पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी मधील फुटपाथ/ डिवायडरर्स दुरुस्ती व रंगकाम करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी फुटपाथ व डिवायडर्स नादुरुस्त अवस्थेत आहेत. स्वच्छ अभियान अंतर्गत सदर फुटपाथ/ डिवायडर्स दुरुस्ती/ रंगरंगोटी करणे आवश्यक आहे. त्याकामी होणाऱ्या रक्कम रुपये ४५ लाख खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा. श्रीम.छाया पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४ | बालदिनाचे औचित्य साधुन महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळावे आयोजित करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- १४ वर्षाखालील मुलांकरीता महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी बालमेळावे आयोजित करण्यांत यावे. नोंदणीकृत संस्था/मंडळे तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त माध्यमाने महानगरपालिका हद्दीत सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत यावे. या कार्यक्रमाकरीता नोंदणीकृत संस्थेमार्फत मदतीची मागणी केल्यास महानगरपालिकेमार्फत कार्यक्रमाकरीता मंडप, स्टेज, साऊंड सिस्टीम, टेबल, खुर्ची, जनरेटर, फोटोग्राफर, व्हिडीओ शुटींग, मुलांना खाऊ, विविध प्रकारची खेळणी, चहा-नाश्ता, पिण्याचे पाणी, ट्रॉफी, सन्मान चिन्ह, बॅनर व इतर जाहिरात प्रसिध्दी तसेच संस्थेमार्फत वाटप करण्यांत येणाऱ्या इतर साहित्याचा खर्च देखील महानगरपालिकेमार्फत करण्यांत यावा. तसेच सेवाभावी संस्थेला त्यांच्या इतर खर्चाकरीता कमाल १५,०००/- रु. पर्यंत अर्थसहाय्य देण्यांत यावे. ज्या सेवाभावी संस्था नोंदणीकृत असतील अशा संस्थांनाच या योजनेकरीता पात्र ठरविण्यांत यावे.<br>या कामी येणाऱ्या अंदाजे ७,००,०००/- रु. खर्चाच्या मंजुरीस ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | अनुमोदक :- मा.श्रीम.छाया पाटील सूचक :- मा.श्री.समीर डबरे<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ५ | बालदिनाचे औचित्य साधुन महानगरपालिका हद्दीतील जि.प शाळेतील व अंगणवाडीतील मुलांना खाऊ वाटप करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- बालदिनानिमित्त महानगरपालिका हद्दीत जि.प. शाळेत व अंगणवाडीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेमार्फत खाऊवाटप करण्यांत यावे. उदा. विविध प्रकारची चिक्की किंवा इतर खाऊ देण्यांत यावा. खाऊ वाटप करणेकामी महानगरपालिकेमार्फत वाहने व मदतीकरीता कर्मचारी पुरवठा करण्यांत यावा. या कामी येणाऱ्या निविदा प्रक्रिया करुन भांडार विभागामार्फत खाऊ वाटप करण्यांत यावा. याकामी येणाऱ्या अंदाजे ८,००,०००/- खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ६ | प्रभाग समिती जी अंतर्गत जुचंद्र पाझर तलाव येथील जी.एस.आर ते जुचंद्र कार्यालयाजवळील असलेल्या साठवण टाकीपर्यंत १६०मी.मी. व २०० मी.मी. व्यासाची एच,डी,पी,ई. गुरुत्व जलवाहिनी पुरविण, अंथरणे व जोडणे याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री.मिलिंद घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ७ | "क्लीनअप मार्शल" च्या कामाबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत प्रस्तावात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. तसेच नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत कार्यरत ठेकेदारास मुदतवाढ देण्यास ही सभा मंजुरी देत असून या कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ८ | प्रभाग समिती **अ** मधील विरार पुर्व प्रभाग क्रमांक ४ मध्ये रमाकांत पाटील चाळीपासून ते जगन्नाथ पाटील चाळीपर्यंत पाईप गटार बसविणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.२९,९१,७८५/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ९ | प्रभाग समिती **अ** मधील विरार पुर्व प्रभाग क्रमांक ४ मध्ये रमाकांत पाटील | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.४६,३७,५९४/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते. |

| | | |
|---|---|---|
| | चाळीपासून ते जगन्नाथ पाटील चाळीपर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्रीम.कांता पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १० | प्रभाग समिती **अ** मधील विरार पुर्व प्रभाग क्रमांक ४ मध्ये नारंगी फाटक ते जी.एम.हॉटेल पर्यंत पाईप गटार बसविणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.१९,००,५०४/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा. श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ११ | प्रभाग समिती **बी** कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पु) तुळींज हॉस्पीटल मधील शेड, रेलींग तसेच अंतर्गत विविध अनुषंगिक कामे करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन उपरोक्त नमुद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.छाया पाटील सूचक :- मा.श्री.समीर डबरे<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १२ | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र. १६ मध्ये दफ्तरी अपार्ट ते मंगलमूर्ती अपार्ट पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.१९,६६,०७३/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १३ | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र. १६ मध्ये राम मंदिर ते गुलमोहर अपार्ट पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.१९,१०,७७१/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरिवले<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १४ | प्रभाग समिती क मधील विरार (पू.) मध्ये वृंदावन अपार्ट ते आर. जे. मेन रोड पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.१०,४९,०५९/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री. अब्दुल हक रहमान पटेल सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १५ | प्रभाग समिती ब मधील विरार (पू.) येथील | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.५४,७६,९४६/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत |

| | | |
|---|---|---|
| | बरफपाडा रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | आहे. व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रिक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १६ | सन २०१५-१६ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता बांधकाम विभाग करिता दैनंदिन बांधकामास लागणारे साहित्य पुरवठा करणे कामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता **मे.देव एंटरप्रायजेस** (वाटाघाटीने) हयांची निविदा कमी दराची व वाजवी आहे. मुख्यलेखापाल व मुख्य लेखापरिक्षक हयांनी सदरचे दर मंजुरीची शिफारस केली आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर ठेवणेत आलेली आहे. सदर दरास हि सभा मंजुरी देत आहे. असे हि सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.छाया पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १७ | विरार (प) पाचघर येथील अंतर्गत तलाव सुशोंभिकरण करणे कामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता **मे.ए.जी. पाटील** हयांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा ४.९१% जास्त दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १८ | प्रभाग समिती ड, (९६) मधील ऋषभ टॉवर जवळ समाजमंदीर बांधणे कामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची **मे.श्री. एन्टरप्रायजेस** यांची ४.५% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासुन मंजुरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार **मे.श्री. एन्टरप्रायजेस** यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रिक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १९ | प्रभाग ड (९६) मधील चुळणे गास रस्त्यालगत साईकलसाठी रस्ता तयार करणे कामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- सदर कामासाठी यापुर्वी तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्रथम जाहिर निविदा मागविली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. दुसऱ्या वेळे फेर निविदा मागविण्यात आली असता त्यावेळेसही एकही निविदा प्राप्त झाली नाही. तिसऱ्या वेळी फेरनिविदा मागविली असता तीन निविदा प्राप्त झाल्या. परंतु तांत्रिक कागदपत्रांच्या अभावी दोन निविदा अपात्र ठरल्या त्यामुळे चौथ्या वेळेस फेरनिविदा मागविण्यात आली व त्यामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या व त्या वित्तीय बोलीचा लिफाफा उघडण्यास पात्र झ्ााल्या आहेत. चौथा कॉल असल्याने सदर निविदा उघडण्यास ई-निविदेतील तरतुदीनुसार पात्र आहेत त्यामुळे उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची **मे.बालाजी कन्स्ट्रक्शन** यांची ४.९९% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासुन मंजुरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम |

| | | |
|---|---|---|
| | | १९४९ चे कलम ७३ (क) नुसार **मे.बालाजी कन्स्ट्रक्शन** यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रिक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २० | वॉर्ड नं. ५५ (८५) वसंतकुंज येथे आवार भिंत,पंपरुम, शौचालय, पाण्याची टाकी बांधणे कामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची **मे.हमिद जे. शेख** यांची १.७८६% कमी **दराची** निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासुन मंजुरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार **मे.हमिद जे. शेख** यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २१ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सामुहीक शौचालय बोधणे कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- उपरोक्त निविदाधारकांच्या निविदा अंदाजपत्रकीय दरानुसार मंजूर करणेत येऊन त्यांचे पॅनेल नियुक्त करणेस तसेच अन्य कोणीही नोंदणीकृत ठेकेदार सदर दराने काम करणेस तयार असल्यास त्यांना पॅनलवर नियुक्त करणेस ही सभा मंजुरी देत आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रिक्स सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २२ | सुर्या पाणी पुरवठा योजनेतील मासवण बंधा-याच्या खालच्या बाजूस मासवण ग्रामपंचायतीसाठी स्मशानभूमी विकसीत करणे कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची **मे.मेघना एन्टरप्रायजेस** यांची ६.०१% जादा दराची (वाटाघाटी नंतर ४.५०% जास्त दराने) निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासुन मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार **मे.मेघना एन्टरप्रायजेस** यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्रीम.कांता पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २३ | वसई विरार शहरमहानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी करणे वैगेरे कामे करणे (सन २०१५-१६)(फेर निविदा) कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता **मे.श्री.जी. कन्स्ट्रक्शन, मे. नेवाळकर एन्टरप्रायजेस, मे.एन.ए.कंन्स्ट्रक्शन, मे. जयभवानी इन्फ्रा प्रोटेक्टस, मे.श्री. गजानन कंन्स्ट्रक्शन** हयांनी निविदा (वाटाघाटीने) सर्वात कमी व वाजवी आहे. सदर कमी दरांची निविदा संविदा करणेसाठी शिफारस करणेत आलेली आहे. तरी कमी दराच्या निविदा धारकास संविदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर निविदा दर मंजुर करण्यात आले आहेत. सदरचे दर कमी असुन वाजवी आहे.<br>तसेच सदर दराने अन्य निविदाधारक काम करणेस इच्छुक असल्यास पॅनल नियुक्त करुन घेणे इष्ट होईल. तरी पॅनेलवर इच्छुक निविदा धारकांच्या नियुक्तीसाठी ही सभा मंजुरी देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. नव्याने A,B,C,D.E,F,G,H,J प्रभाग समित्या स्थापन झाल्या असल्याने सर्व प्रभाग समित्या कार्यक्षेत्रात काम करणेस |

| | | |
|---|---|---|
| | | ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २४ | जाहीरात कराच्या बोर्डची रक्कम निर्लेखीत करणे बाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ अन्वये जाहिरात करांचे बोर्ड अस्तित्वात नसल्यामुळे न वसूल होण्याजोगा कर, म्हणून सदर जाहिरात बोर्डाचे कर निर्लेखित करणेस ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रिक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २५ | सन २०१५-१६ वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागास दिवे व दिवाबत्ती साहित्य पुरवठा करणेकामी प्राप्त ई-निविदांमधील कमी दराच्या ई-निविदांस मंजुरी देऊन संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** वरील प्राप्त ई-निविदांमधील दरांची तुलनात्मक पडताळणी केली असता तुलनात्मक रित्या कमी असलेल्या काही दरांमध्ये दरांच्या वाटाघाटी करण्यांत आल्या. वाटाघाटी अंती मान्य केलेले दर हे योग्य व वाजवी आहेत. तथापी घटक क्र. १/१/७, १/१/१३, १/१/१५, १/१/१९, १/१/२३, १/१/२८ १/१/२९, १/२/१, १/३/१८, १/४/६, २/१/२, २/१/३, २/१/६, २/१/७, २/१/१०, २/१/११, २/२/१३, २/२/१४, २/२/१५, ३/१/९, ३/१/१७, ३/१/१८, ३/२/१, ३/३/१, ३/३/७, ३/३/११, ३/३/१५, ३/३/१६, ३/३/१७, ३/३/१९, ३/३/२३, ३/३/२४, ३/४/१०, ३/४/११, ३/४/१२ हया घटकांसाठी वाटाघाटी न झाल्याने व सदरचे दर सन २०१३-१४ च्या मंजुर दरापेक्षा बरेच जास्त असल्याने सदरील घटकांचे दर नामंजुर करुन फेर निविदा करणे व उर्वरित सर्वात कमी दरांच्या निविदा मंजुर करण्यांत येत आहे. सदर ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मंजुरीस शिफारस केली आहे. सदरचे दर हे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी मागविण्यांत आलेले आहेत. परंतु सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा कालावधी हा कमी राहिलेला आहे. त्याकरीता महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये सर्वात कमी दरांच्या ई-निविदाकरांबरोबर माहे मार्च २०१७ पर्यंतचे कालावधीसाठी वाटाघाटी अंती कमी दराचे निविदाकाराबरोबर संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अब्दुल हक सुलेमान पटेल सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २६ | वसई-विरार शहर महानगरपालिका विविध प्रभाग समिती कार्यालय व मुख्यालय येथील कार्यरत असलेले संगणक, प्रिंटर, स्कॅनर व इतर साहित्य सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता स्पेअर पार्टसहित देखभाल दुरुस्ती करणे व आवश्यक स्पेअर पार्ट पुरवठा करणेकामी संविदा करणे. | **ठराव :-** प्राप्त निविदांमधील मे. व्हिजन इन कॉर्पोरेशन यांचे ई-निविदेमधील दर तुलनात्मक कमी आहेत. प्राप्त तुलनात्मक दर व वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर हे योग्य व वाजवी आहेत. तसेच सदरचे प्राप्त तुलनात्मक कमी दर व वाटाघाटी अंतीचे प्राप्त दर हे बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी आहेत. सदरच्या प्राप्त ई-निविदा दरास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजुरीस शिफारस केली आहे.<br>सदरचे दर हे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी मागविण्यांत आलेले आहेत. परंतु सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा कालावधी हा कमी राहिलेला आहे. त्याकरीता मार्च २०१७ पर्यंतचे कालावधीसाठी संविदा करणे योग्य होईल. त्याकरीता महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये कमी दराचे ई-निविदाकारांबरोबर माहे मार्च २०१७ पर्यंतचे कालावधीसाठी संविदा करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अब्दुल हक सुलेमान पटेल सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत |

| | | |
|---|---|---|
| | | ठराव सर्वानुमते मंजूर |
| २७ | कु. जयश्री पांडुरंग मानकर, लिपिक यांचे वैद्यकीय बिलाची प्रतीपुर्ती मिळणेबाबत. | **ठराव :-** जिल्हा शल्य चिकीत्सक, ठाणे यांचेकडील दिनांक १५/०६/२०१५ रोजीचे आदेश पाहण्यांत आले. कु. जयश्री पांडुरंग मानकर यांस सदरहू आदेशाप्रमाणे त्यांचेवर शस्त्रक्रिया व औषधोपचारा करीता झालेला एकूण खर्च रक्कम रु. २११४६२/- पैकी औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चापैकी ९० % रक्कम रु. १८३३८६/- व रुग्णालयात झालेल्या प्रत्यक्ष खर्चापैकी ९५ % रक्कम रु. ७३१५/- अशी एकूण वैद्यकिय खर्च प्रतिपुर्तीची देय रक्कम रु. १,९०,७०१/- (अक्षरी एक लाख नव्वद हजार सातशे एक मात्र) अदा करणेस आजची हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रिक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २८ | वॉर्ड क्र. ६५ मधील दिवानमान स्मशानभुमीचा विकास करणेबाबत कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची **मे. सुधाकर बी. दातीर यांची २४.९% जास्त दराची (वाटाघाटी नंतर ५% जादा दराने )** निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजुरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. सुधाकर बी. दातीर यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रिक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २९ | भारत सरकार यांचेकडील दर करार मधून ५० नग लिनोवो कंपनीचे संगणक खरेदी करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त प्रस्ताव अवलोकनी घेता नव्याने स्थापित प्रभाग समिती कार्यालय व नवीन आरोग्य केंद्र यांना संगणक यंत्रणा तातडीने पुरवठा करणे गरजेचे आहे. तसेच याबाबतचे दर वार्षिक निविदेमध्ये मंजुर नसल्याने व निविदा प्रक्रिया करुन खरेदी करण्यास विलंब होणार आहे. करीता भारत सरकार दर करार RC NO. COMPUTER/ IT- 1 /RC71090000/2015/81/04878/4542 Dated 17/03/2015 मधील मंजुर दराने ५० नग संगणक ई-निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) अन्वये थेट खरेदीस व मंजुर पुरवठाकारासोबत संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच या कामी होणारा खर्च रु. २१,५२,५००/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३० | वसई-विरार शहर महानगरपालिकेस सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात प्रशासनाच्या कामाकरीता आवश्यकते नुसार नमुन्याप्रमाणे स्टेशनरी छपाई करून पुरवठा | **ठराव :-** प्राप्त निविदांमधील श्री. अनिरुध्दाय इंम्प्रेशन, मे. साक्षी एंटरप्रायझेस, मे. एच.एम.पी.एंटरप्रायझेस, मे. महाराणी प्रिंटर्स, मे. मुकुंद प्रिंटर्स, मे. चंडिका प्रिंटर्स यांचे ई-निविदेमधील दर तुलनात्मक कमी आहेत. सर्वात कमी दराचे निविदाकाराबरोबर वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर बाजारभावानुसार पडताळणी केली असता प्राप्त दर हे योग्य व वाजवी आहेत. सदरच्या ई-निविदा दरास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासून मंजुरीची शिफारस केली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | करणेकामी प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराच्या निविदांकारांबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | सदरचे दर हे सन २०१५-१६ यावित्तीय वर्षासाठी मागविण्यांत आलेले आहेत. परंतु सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा कालावधी हा कमी राहिलेला आहे. त्याकरीता मार्च २०१७ पर्यंतचे कालावधीसाठी संविदा करणे योग्य होईल. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३(क) अन्वये वाटाघाटी अंती कमी दराचे ई-निविदाकारांबरोबर माहे मार्च्र २०१७ पर्यंतचे कालावधीसाठी संविदा करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३१ | वसई कोल्टस् यांचे दिनांक ०९/११/२०१५ चे अर्जाबाबत चर्चा करुन निर्णय घेणे. | **ठराव :-** सदर विषयावर सभेत चर्चा करण्यांत येऊन वसई कोल्टस्, वसई या क्रीडा संस्थेने मुंबई क्रिकेट असोसिएशन यांच्या मान्यतेने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी १४ व १६ वर्षाखालील मुलांची वसई तालुका आंतरस्कूल्स क्रिकेट स्पर्धा व माजी रणजीपटू कै. मनोहर अ. राऊत यांचे स्मृतीप्रित्यर्थ आयोजित केलेल्या १९ वर्षाखालील मुलांची वसई तालुका आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी गतवर्षी रक्कम रु.१ लाख इतके अनुदान देण्यांत आले होते. त्याचप्रमाणे यावर्षीही सदर स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी खर्चाची प्रतिपूर्ती करणेकामी रक्कम रुपये १ लक्ष मात्र इतके अनुदान वसई कोल्टस यांचे नांवे धनादेशाद्वारे अदा करणेकामी आजची ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३२ | नालासोपारा विभागीय शालेय कला क्रिडा महोत्सव २०१५ करीता विद्युतीकरण, ध्वनीप्रक्षेपण व इतर व्यवस्था करणेकामी प्राप्त निविदांमधील कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा विभागीय "शालेय कला क्रीडा महोत्सव २०१५" करीता विद्युतीकरण, ध्वनीप्रक्षेपण व इतर व्यवस्था करणेकामी मे. आर्यन इलेक्ट्रिकल्स यांचे अ.क्र. ८ व ९ तसेच मे. साई वैभव इलेक्ट्रिकल्स यांचे अ.क्र. १, २, ३, ४, ५, ६, ७ व १० या कामांचे दर इतर निविदाधारकांपेक्षा कमी होते. सदर दराबाबत वाटाघाटीनुसार ठेकेदाराने कमी केलेले दर मंजुर करणें येत आहेत. तरी सदर ई.निविदा धारकांबरोबर कामाच्या संविदा करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३३ | नालासोपारा विभागीय शालेय कला क्रिडा महोत्सव २०१५ करीता स्टेज मंडप, डेकोरेशन व इतर व्यवस्था करणेकामी प्राप्त निविदांमधील कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा विभागीय "शालेय कला क्रीडा महोत्सव २०१५" करीता स्टेज मंडप, डेकोरेशन व इतर व्यवस्था करणेकामी मे.राजकुमार इलेक्ट्रिकल्स यांचे अ.क्र. १, २, ३, ४ तसेच साई डेकोरेटर्स ॲण्ड सर्विर्स यांचे अ.क्र. ६ ते १० या कामांचे दर इतर निविदाधारकांपेक्षा कमी आहेत. तरी कमी दराच्या ई-निविदा धारकांबरोबर कामाच्या संविदा करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३४ | मा. स्थायी समिती सभा दि. ९/११/२०१५ विषय क्र. १ ठराव क्र. १५७ चे | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावांवर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर प्रकरणी फेरनिविदा मागवून कार्यवाही करणेस एकमताने ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | निर्णयानुसार ठेकेदाराबरोबर करणेत आलेल्या वाटाघाटीचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत. | अनुमोदक :- मा.श्री.अब्दुल हक सुलेमान पटेल सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |